RNI.NO.MAHAR/2013/55083

नि : पक्ष वृतपत्र

संग्राम सत्तेचा

संपादक बाबा ढाकणे

www.sangramsattacha.com

ऑनलाईन न्यूज नेटवर्क
यु ट्यूब,फेसबुक, ट्विटर, इन्स्ट्राग्रामसह अन्य सोशल साईटसाठी...
बातम्या व जाहिरातींसाठी
मो : 9764983002
पहा www.nagarreportar.com
www.sangramsattacha.com

अहिल्यानगर वर्षे १२ अंक ४३ गुरुवार दि.३० जानेवारी २०२५ किंमत २ रु.

अहिल्यानगरात कै.बलभिमअण्णा जगताप क्रीडानगरी, वाडियापार्क येथे

महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेस प्रारंभ



लाल मातीने देशाला स्वर्ण पदक मिळून दिले : पद्मश्री पोपटराव पवार

संग्राम सत्तेचा वृत्तसेवा
ऑनलाईन नेटवर्क

अहिल्यानगर : कुस्तीचे संस्कार नगरच्या लाल मातीत होते म्हणून ४ नगराध्यक्ष शहराला लाभले आणि लाल मातीने देशाला सुवर्णपदक मिळून दिले. मैदानाचे संस्कार खूप मोठे असून उद्याच्या पिढीच्या भविष्यासाठी मार्गदर्शक ठरेल सध्या सोशल मीडियाच्या वापरामुळे मैदाने रिकामी पडले आहे. आजचा तरुण व्यसनाधीन्तेकडे वळत चालला असून त्याला पुन्हा एकदा मैदानाकडे घेऊन जाण्याची जबाबदारी आपल्या सर्वावर आहे. छत्रपती शाहू महाराजांनंतर वाडिया पार्क मैदानामध्ये आमदार संग्राम जगताप यांनी महाराष्ट्र कुस्ती स्पर्धेचे आयोजन केले आहे. वाडिया पार्क मैदानामध्ये मी देखील क्रिकेट चे सामने खेळलो त्यामुळे देश पातळीवर खेळण्याची संधी मला मिळाली खेळाच्या माध्यमातून संस्कार मिळत असतात असे प्रतिपादन पद्मश्री पोपटराव पवार यांनी केले

वाडिया पार्क येथे कै.बलभीमअण्णा जगताप क्रीडा नगरी मैदानात महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचा रणसंग्राम चा शुभारंभ पद्मश्री पोपटराव पवार यांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी आयोजक आमदार संग्राम जगताप, माजी आमदार अरुणकाका जगताप, माजी आमदार भीमराव धोंडे, जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला, माजी उपमहापौर गणेश भोसले, आयुक्त यशवंत डांगे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष संपत बारस्कर, भाजपचे शहर अध्यक्ष अभय आगरकर, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अनिल शिंदे, उद्योजक नरेंद्र फिरोदिया, हिंदकेसरी योगेश दोडके, संदीप भोंडवे, संतोष भुजबळ, संजय शेंडगे, मनोज कोतकर, अविनाश घुले, अनिल गुंजाळ, सुभाष लोंढे, शिवाजी चव्हाण, महाराष्ट्र केसरी गुलाब बर्डे, अशोक शिर्के, दिनेश गुंड, धनंजय जाधव, भैया गंधे, रवि बारस्कर आदी उपस्थित होते

आयोजक आमदार संग्राम जगताप म्हणाले की कुस्ती क्षेत्राची आवड ही खेड्यातील प्रत्येक गावकऱ्यांचे स्वप्न असते त्यामुळेच खेड्यापर्यंत कुस्ती पोहोचली आहे या स्पर्धेमध्ये कुठल्याही पैलवानावर अन्याय होणार नाही. या स्पर्धेमध्ये पुरुष व महिला पंच सहभागी झाले आहे. त्यामुळे स्पर्धेचा दर्जा वाढलाय या स्पर्धेमध्ये सुमारे ९०० मल्ल सहभागी झाले आहे आमचे आजोबा कै.बलभीमअण्णा जगताप यांनी नेहमीच कुस्ती क्षेत्रातील मल्लना आर्थिक मदत करत पैलवान घडविण्याचे काम केले आहे. पाया पडण्याची परंपरा कुस्तीच्या लाल मातीतून होत आहे शासकीय नोकरीमध्ये पहिल्या क्रमांकाच्या पैलवान ला सामावून घेतले जाते मात्र आता आपल्या सर्वांना शासनाकडे पाठपुरावा करावा लागेल की दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकाच्या मल्लना देखील शासकीय नोकरीमध्ये सामावून घेण्यासाठी प्रयत्न करावे लागणार आहे. आपल्या शहरांमध्ये विविध खेळाचे सामने आयोजित करणे गरजेचे असून त्या नुसार खेळाडूंना हक्काचे व्यासपीठ निर्माण करून देण्यासाठी शासनाच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय दर्जाचे मैदान निर्माण होणार आहे महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेच्या माध्यमातून खेळाडू लाल मातीची परंपरा आणि संस्कार घेऊन जाणार असल्याचे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले. **(पान २ वर)**

जिल्हाधिकारी, तहसीलदार, प्रांताधिकाऱ्यांना द्याव्या लागणार गाव भेटी

संग्राम सत्तेचा वृत्तसेवा
ऑनलाईन नेटवर्क

मुंबई : महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जिल्हाधिकारी, तहसीलदार आणि प्रांताधिकाऱ्यांनी दर आठवड्याला गाव भेटी देऊन शासनाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले आहेत. यासंदर्भात महसूल विभागाकडून ११ कलमी परिपत्रक जाहीर करण्यात आले आहे. वेगवान कारभारासाठी महसूल विभागाकडून महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आल्याचे समजते. त्यामुळे आता मंत्र्यांपाठोपाठ सरकारी अधिकारीही जनतेत जाऊन काम (पान २ वर)

मनोज जरांगेंची मोठी घोषणा ; यापुढे शक्यतो आरक्षणाच्या लढाईसाठी उपोषण करणे बंद

उपोषण सुटले; मराठा आरक्षण आंदोलनाबद्दल घेतला असा निर्णय

संग्राम सत्तेचा वृत्तसेवा
ऑनलाईन नेटवर्क

अंतरवाली सराटी (जालना): मराठा आरक्षण मिळावेत, या मागणीसाठी अंतरवाली सराटीत सुरु केलेले उपोषण मनोज जरांगे यांनी थांबवण्याचा निर्णय घेतला आहे. मराठा आरक्षणाचा खरा मारेकरी कोण हे आता समोर आलं आहे, मराठा समाजाचे डोळे उघडले आहेत, असं म्हणत जरांगेंनी मुख्यमंत्री (पान २ वर)

मनोज जरांगे यांनी आज संध्याकाळी पत्रकार परिषदेत यापुढील आंदोलनाचे संकेत दिले आहेत. ते म्हणाले की, उद्या दुपारी १२ वाजतापर्यंत उपोषण सोडण्याबद्दल निर्णय घेतला जाईल. या पुढील आंदोलन हे उपोषणाचे नसेल तर ते आता झकपक आंदोलन असेल. उपोषण सोडण्याचा निर्णय मराठा समाजासोबत बोलून घेतला जाईल असेही त्यांनी सांगितले.जरांगे यांनी उपोषण सोडण्याचा निर्णय जवळपास निश्चित केला आहे. **(पान २ वर)**

सण उत्सव कार्यक्रमातून सांस्कृतिक परंपरेचे जतन : अलकाताई कर्डिले

बुऱ्हाणनगर येथे अलकाताई शिवाजीराव कर्डिलेंच्या वतीने हळदीकुंकू कार्यक्रमानिमित्त २० हजार सुहासिनींचा गौरव

संग्राम सत्तेचा वृत्तसेवा
ऑनलाईन नेटवर्क

अहिल्यानगर : मराठी कुटुंबीय वर्षभर विविध सण उत्सव धार्मिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न करत असतात. त्या माध्यमातून आपल्याला लाभलेली महान संस्कृती व परंपरेचे जतन होत असते. हळदी कुंकू कार्यक्रम हा ग्रामीण भागातील महिलांसाठी एक पर्वणीच आहे, असे प्रतिपादन अलकाताई कर्डिले यांनी केले.

बुऱ्हाणनगर येथे अलकाताई शिवाजीराव कर्डिले यांच्या वतीने हळदी कुंकू कार्यक्रमानिमित्त २० हजार सुहासिनींचा गौरव करण्यात आला.यावेळी प्रियांका अक्षय कर्डिले उपस्थित होत्या.

श्रीमती कर्डिले पुढे म्हणाल्या की,जेणेकरून सर्व महिला एकत्र येतात आपल्या विचाराची देवाण-घेवाण करतात व सांस्कृतिक कार्यक्रमाचा आनंद घेत असतात आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या माध्यमातून वर्षभरात दिवाळी-पाडवा, हळदी-कुंकू संतपूजन आदिसह विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. त्यामुळे नगर जिल्ह्यासह राहुरी, पाथर्डी, नगर तालुक्यातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहत असतात. हळदी-कुंकू कार्यक्रमानिमित्त २० हजार सुहासिनींचा गौरव करण्यात आला आहे. या माध्यमातून एकमेकींमध्ये ऋणानुबंध, आपुलकी, प्रेम भावना निर्माण होते. जनतेचे कर्डिले परिवारावर असलेले प्रेम कार्यक्रमांच्या माध्यमातून दिसून येते. हळदी-कुंकू कार्यक्रमानिमित्त दरवर्षी महिलांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. महिलाच खऱ्या अर्थाने समाजात दिशादर्शक काम करताना दिसत आहे. या धकाधकीच्या जीवनामध्ये कुटुंबाची जबाबदारी पार पाडत मुला-मुलींना संस्काराचे धडे देखील देण्याचे काम करत असतात. त्यामुळे समाजामध्ये सुसंस्कृत पिढी निर्माण

कर्डिले कुटुंबांची जनतेशी असलेले अतूट नाते मी गेल्या ३ वर्षापासून पाहत आहे हे भाग्य मला लाभले आहे आमच्या घरी येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा पाहुणचार केला जातो त्यामुळेच जनता मोठ्या संख्येने कार्यक्रमानिमित्त येत असतात हळदी-कुंकू सणानिमित्त राहुरी, पाथर्डी, नगर तालुका व शहरांमधून महिला येतात त्यांना वाणाचे वाटप केले जाते आपल्याला लाभलेली सांस्कृतिक वारसा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जाण्याचे काम होत असल्याचे मत प्रियंका कर्डिले यांनी व्यक्त केले